2018-19

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

38/2019



330

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - V

Ajanta Prakashan

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

61

Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5** (www.sjifactor.com)

# १०. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे, परिणाम व उपाय

**प्रा. डॉ. मेघराज आर. शिंदे**
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर.

१९९० नंतर शेतकऱ्याच्या आत्महत्येत वाढ होत चालली आहे. देशातील काही राज्यामध्ये उदा. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश ,तेलगणा, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, छत्तीसगड या राज्यात शेतकऱ्याच्या आत्महत्या मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते. या संपुर्ण आत्महत्याचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, या आत्महत्या कापूस उत्पादकाच्या आहेत. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्याच्या आत्महत्येची चर्चा २००० पासून सुरू झाली. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यामध्ये विदर्भात शेतकऱ्याच्या आत्महत्या जास्त प्रमाणात झाल्या आहेत. विदर्भात कपूस हे पीक जास्त प्रमाणात घेतल्या जाते. विदर्भातील शेती कोरडवाहू आहे. विदर्भात सिंचनाचे प्रमाण कमी आहे. विदर्भातील शेतीतील ८९ टक्के शेती कोरडवाहू आहे. ही कोरडवाहु शेती निसर्गाच्या पावसावर अवलंबून आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्याची शेती उत्पन्न कमी होत चालले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा निसर्गासोबत जुगार चाललाआहे. शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

या आत्महत्या बुलडाणा, अकोला, वाशिम, यवतामळ, वर्धा या जिल्हयात जास्त प्रमाणात घडवून येत आहेत. कारण या जिल्हयात कोरडवाहु शेतीचे प्रमाण जास्त आहे. आधुनिक काळात शेती करणें कठिण झाले आहे, शेती करणे खर्चिक झाले आहे. या कारणामुळे देखिल शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चलल्या आहेत. शेती करीत असतांना सुधारित बियाणे ,खत,फवारणी, यंत्राच्या आधारे शेती इ. साधनाचा वापर करावा लागतो. या पध्दतीने शेती करतांना बराच खर्च येतो. या उलट शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. उत्पन्न व खर्च याचा मेळ बसत नाही. यामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत. विदर्भात शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. हे शोधण्यासाठी अनेक संस्था व समित्यानी संशोधन केले. त्यांनी शेतकऱ्याच्या आत्महत्येची अनेक कारणे सांगितली आहेत.

### आत्महत्या म्हणजे काय ?

कोणत्याही व्यक्तीने आपले जीवन कृत्रिमण्गे संपविण्याच्या कृतील आत्महत्या असे म्हणतात.व्यक्तीला अनेक समस्या असतात. या समस्या वाढत जातात. जीवन जगणे कठिण होवून जाते तेंव्हा व्यक्ती आत्महत्या करते. आत्महत्येचा अभ्यास सर्व प्रथम: एमिल डरखाईम या समाजशास्त्रज्ञने केला. त्यांने आत्महत्येचा सर्वांगीण अभ्यास केला. त्यांने असे स्पष्ट केले की, आत्महत्येला व्यक्ती जबाबदार नसून समाज जबाबदार आहे. समाज व्यक्तीला आत्महत्येला बाध्य करतो. तसेच आत्महत्या ही एक मानसिक विकृती आहे. आपल्या समोर असलेली समस्या सोडविण्यापेक्षा व्यक्तीला आपले जीवन संपवावे वाटते. या पेक्षा व्यक्तीने समस्या सोडविणे गरजेचे आहे. आत्महत्या ही व्यक्तीची शेवटची समस्या आहे. आत्महत्येने व्यक्ती



Scanned by TapScanner

आपला नाश करून घेते. व्यक्ती स्वतःला संपविते. ही सर्वात ज्वलंत समस्या आहे. समाजात आत्महत्येचे प्रमाण वाढत चालले आहे. आत्महत्या कमी करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**विदर्भातील शेतकरी आत्महत्यासन २००१ते २०१५**

| वर्ष | भारतातील शेतकरी आत्महत्या | महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या | महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांचे भारतातील शेतकरी आत्महत्यांशी शेकडा प्रमाण | विदर्भतील शेतकरी आत्महत्या | विदर्भतील शेतकरी आत्महत्यांचं महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| २००१ | १६४१५ | ३५३६ | २१.५४ | ५२ | १.४७ |
| २००२ | १७९७१ | ३६९५ | २०.५६ | १०४ | २.८२ |
| २००३ | १७१६४ | ३८३६ | २२.३५ | १४८ | ३.८६ |
| २००४ | १८२४१ | ४१४७ | २२.७४ | ४४७ | १०.७८ |
| २००५ | १७१३१ | ३९२६ | २१.९० | ४४५ | ११.३४ |
| २००६ | १७०६० | ४४५३ | २६.१० | १४४९ | ३२.५४ |
| २००७ | १६६३२ | ४२३८ | २५.४८ | १२४७ | २९.४२ |
| २००८ | १६७९६ | ३८०२ | २२.६४ | ११४८ | ३०.२० |
| २००९ | १७३६८ | २८७२ | १६.५४ | १००५ | ३४.९९ |
| २०१० | १५९६४ | ३१४१ | १९.६८ | ११७७ | ३७.४७ |
| २०११ | १४०२७ | ३३३७ | २३.७९ | ९९९ | २९.९४ |
| २०१२ | १३७५४ | ३७८६ | २७.५३ | ९५० | २५.०९ |
| २०१३ | ११७७२ | ३१४६ | २६.७२ | ८०५ | २५.५९ |
| २०१४ | १२३६० | २५६८ | २०.७८ | ९६३ | ३७.५० |
| २०१५ | १२०२ | ३२२८ | २५.६२ | १',३६ | ४७.५८ |
| एकूण | २३६०५७ | ५३७११ | २२.७५ | १२४७५ | २३.२२ |

## शेतकरी आत्महत्येची कारणे

१) **कर्जबाजारीपणाः**-शेतकऱ्याच्या आत्महत्या होण्याला कर्जबाजारीपणा मोठया प्रमाणात जबाबदार आहे. शेती करण्यासाठी, शेतीची मशागत करण्यासाठी शेतकरी सहकारी बँका, सावकार यांचे कर्ज घेतो. या कर्जाची परत फेड करणे शेतकऱ्याला शक्य होत नाही. घेतलेल्या कर्जाचे व्याज वाढत जाते. शेतकऱ्याला घेतलेले कर्ज अधिक व्याज परत करणे शक्य होत नाही. प्रसंगी फक्त व्याज देण्याचा प्रयत्न केला तरी सर्व शेतकऱ्यांना शक्य होत नाही. असे अभ्यासात आढळून आले आहे. म्हणून कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

330



Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

२) **वाढता उत्पादन खर्च :-** शेती करणे आता कठिण झाले आहे. शेती खर्चिक झाली आहे. शेतीसाठी अनेक अवजारे लागतात. खत, बि-बियाणे, किटकनाशके, विहीर, पाईप लाईन, ठिबक, स्प्रिंकलर, ट्रॅक्टर इत्यादी अवजारे लागतात. यांच्या आधारे शेती केल्यास शेतकऱ्याला काही उरत नाही. बऱ्याच वेळा असे होते की,शेतकऱ्याने शेतीसाठी केलेला खर्च निघत नाही. शेतकऱ्यांची मजुरी देखिल निघत नाही. हा खर्च टाळता न येण्यासारखा आहे. हा खर्च करावाच लागतो. त्या तुलनेत शेतकऱ्याला उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

३) **सिंचन सुविधेचा अभाव :-** राज्यातील ८० टक्के शेती कोरडवाहू आहे. या शेतीत दोन पिके घेतली जात नाहीत. पाण्याअभावी उत्पादनात घट होते. शेतकऱ्याचे सिंचन वाढविण्यासाठी शासनाद्वारे अनेक योजना राबविल्या जातात. शेतकऱ्याला विहीर,पाईप लाईन दिली जाते. परिसरातील पाणी पातळी वाढण्यासाठी नदीवर बंधारे बांधले जातात. परंतु पावसाचे प्रमाण कमी होत असल्यामुळे त्याचा परिणाम शेतीवर होत आहे. जर बागायती शेतीत वाढ झाली तर आत्महत्या कमी होऊ शकतात.

४) **निकृष्ठ प्रतिचे बियाणे:-**अनेक कंपन्या निकृष्ठ प्रतिचे बि-बियाणे, खते, किटकनाशके निर्माण करतात. यांचा दर्जा योग्य नसतो. त्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनात घट होते. शेतकऱ्याचे मोठया प्रमाणात नुकसान होते. शेतकऱ्याचा खर्च वाया जातो. या कंपण्याकडून शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळत नाही. अशा घटना शेतकऱ्याच्या बाबतीत दर वर्षी घडतात. शासन अशा कंपण्याना बंद करीत नाही .या कारणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहे.

५) **सततची नापिकी:-** सततची नापिकी हे आत्महत्येचे मुख्य कारण आहे. राज्यात पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनात घट होत चालली आहे. हे काही एका वर्षाचे नाही दर वर्षी निसर्गाचा फटका शेतकऱ्याला बसत आहे. गेल्या तीन वर्षापासून राज्यातील लातुर, परभणी, सातारा, सांगली या जिल्हयात पाऊस पडत नाही दुष्काळग्रस्त जिल्हयाची संख्या वाढत चालली आहे. अनेक जिल्हयात पावसाअभावी पेरणी केली जात नाही. त्यामुळे शेतकऱ्याचा उदरनिर्वाह कसा चालवयाचा हा प्रश्न निर्माण होतो. यामुळे देखील शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत आहेत.

६) **नैसर्गीक आपत्ती:-** शेतकऱ्याला पेरणीपासून माल विक्रीपर्यंत अनेक संकटाला समोर जावे लागते. यामध्ये प्रामुख्याने गारपिटी,अतिवृष्टी, पावसाचा लहरीपणा इत्यादीचा समावेश होतो. नैसर्गीक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची नुकसान होते. बऱ्याच वेळा आलेले पीक वाया जाते, पीकाची नासाडी होते. सध्याच्या काळात दरवर्षी मार्च महिण्यात पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे रब्बी पीक धोक्यात आले आहे. याचाही परिणाम शेतकऱ्याच्या आत्महत्येवर होत आहे.

७) **वाढता खर्च :-** शेतकऱ्याचे उत्पादन घटत चालले आहे. तर त्याचा खर्च वाढत चालला आहे. आधुनिक काळात शेती करणे कठिण झाले आहे. शेती खर्चिक झाली आहे. त्यामुळे शेतीसह कुटुंबाचा खर्च करणे शेतकऱ्याला शक्य

330
Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar

Scanned by TapScanner

होत नाही. शेतीच्या आधारावर कुटूंबाचा उदर्रनिर्वाह करणे कठिण आहे. शेतीच्या भरवशावर कुटूंबाचा खर्च पूर्ण करता येत नाही. या दुष्ट चक्रामुळे देखिल शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत आहेत.

८) **जोड धंदयाचा अभाव :-** विदर्भातील शेतकरी पुर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्याची आत्महत्या वाढत चालली आहे. शेतीला पूरक असे व्यवसाय करणे गरजेचे आहे. उदा. दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, शेळी पालन, वराह पालन, इमु पालन, गांडुळ खत निर्मिती प्रकल्प इत्यादी व्यवसाय करणे गरजेचे आहे. या पध्दतीची शेती राज्यामध्ये केली जात नाही. राज्यात कोरडवाहू शेती जास्त प्रमाणात असल्यामुळे आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

९) **वाढती महागाई :-** शेतकऱ्याच्या आत्महत्येला वाढती महागाई जबाबदार आहे. शेतकऱ्याच्या शेतीचा खर्च वाढला आहे. मजुरीचे दर वाढले आहेत. त्याचबरोबर वाढत्या महागाईमुळे शेतकऱ्याचा खर्च वाढत चालला आहे. तसेच शेतकऱ्याचा जीवन आवश्यक खर्च वाढत चालला आहे. बऱ्याच वेळा शेती मधुन नफा तर मिळतच नाही. परंतु शेतकऱ्यांनी केलेला खर्च देखिल निघत नाही. अशा प्रसंगी शेतकरी हतबल होऊन आत्महत्येचा मार्ग स्विकारतात.

१०) **शेतमालाला कमी भाव :-** या विषयावर बोलतांना शेतकरी नेते चंद्रकांत वानखेडे, अमर हबीब, विजय विल्हेकर, गजानन अहमदाबादकर म्हणतात की, एकतर शेतकऱ्याचे पिकत नाही ही शेतकऱ्याची समस्या असते. दुसरीकडे पिकलेतर शेतकऱ्याची लुट होते. शेतमालाला भाव दिला जात नाही. पीक मातीमोल विकावे लागते. शेतकरी भाव मिळेपर्यंत थांबू शकत नाही. शेतकऱ्याचा माल खरेदी करून व्यापारी लोक लाखो रूपये मिळवितात. उत्पादन करणारा शेतकरी दारिद्रयात जीवन जगतो. त्याचा जन्म दारिद्रयात होतो व शेवट देखिल दारिद्रयात होतो. शासन कोणतेही आले तरी ते शेतकरी विरोधी असते.

११) **पर्यायी रोजगाराचा अभाव :-** विदर्भातील शेती कोरडवाहू आहे. त्यामुळे या शेतीत एकच पीक घेतले जाते. सिंचन कमी असल्यामुळे या शेतीत जास्त लोक सामावून घेतले जात नाहीत. शेतीत पर्यायी रोजगार मिळत नाही. काम करणाऱ्या व्यक्तीला रोजगार मिळत नाही.लोक कामाच्या शोधात शहराकडे स्थलांतर करतात पर्याय रोजगार मिळविण्याचा प्रयत्न करतात. हा रोजगार मिळत नाही तेंव्हा ते निराश होतात. त्यामुळे आत्महत्या वाढत आहेत.

१२) **विभक्ती कुटूंबपध्दती:** भारतीय समाजात विभक्त कुटूंबपध्दती वाढत चालली आहे. या आगोदर समाजात संयुक्त कुटूंबपध्दती अस्तित्वात होती. या कुटूंबात व्यक्तीला जीवन जगताना एकाकी वाटत नव्हते. कुटूंबातील सदस्याना आधार वाटत होता. नव्या कुटूंबपध्दतीत एकटयाला आधार मिळत नसल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत. कुटूंबाच्या विभाजनाबरोबर शेतीचे विभाजन देखिल होत आहे. प्रत्येक व्यक्तीच्या वाटयाला कमी शेती येत आहे. अल्पशेतीमध्ये कुटुंबाचा उदर्रनिर्वाह करणे कठिण आहे.

१३) **शासनाचे धोरण :-** सरकार कोणतेही असले तरी ते शेतकऱ्याला जाचक असते. सत्तेत [illegible] जास्त असलेल्या शेतकऱ्याला अनेक अश्वासने दिली जातात. त्याची पुर्तता नंतर केली जात नाही. शेतक-यांसाठी अनेक

योजना जाहीर केल्या जातात या योजनेचा लाभ शेतकऱ्याला प्रत्यक्ष मिळत नाही. कारण त्याला योजनेची माहिती नसते.शेतकऱ्याच्या योजना कागदोपत्री राबविल्या जातात. त्यामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

**शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना**

१) **शेतकऱ्यांना अनुदान :-** शेतकऱ्याला वाढत्या महागाईमुळे शेती करणे कठीण झाले आहे. त्यासाठी त्याला बि-बियाणे,खते, किटकनाशके, सिंचन सुविधा यासाठी अनुदान देणे गरजेचे आहे. हे अनुदान देत असतांना शेतकऱ्यांला थेट मदत देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांला तातत्काळ मदतीची गरज असते. पेरणी, मशागत करतांना शेतकऱ्यांला मदतीची गरज असते. या प्रसंगी मदत केल्यास त्याचा शेतकऱ्याला फायदा होईल.

२) **रास्त दराने कर्ज पुरवठा :-** शेतकऱ्याला कर्जाची गरज आहे. सततच्या नापिकिमुळे तो वेळच्या वेळी कर्ज भरू शकत नाही. त्यासाठी त्याला कमी व्याज दराने कर्ज दिल्यास आत्महत्या कमी होवू शकतात. शेतकऱ्याला कर्ज परत करणे शक्य झाले नाही तर त्याला कर्जाचे पुर्नगठण करून देणे गरजेचे असते. यासाठी बँक अधिकाऱ्यांने शेतकऱ्याला माहिती देणे गरजेचे असते. या पध्दतीने कर्ज पुरवठा केल्यास आत्महत्या कमी होऊ शकतात.

३) **उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा :-** शेतमालाला उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा द्यावा असे कृषी शास्त्रज्ञ डॉ स्वामीनाथन यांनी सुचविले आहे. प्रत्यक्षात खर्च अधिक पन्नास टक्के नफा दिला जात नाही. सध्याच्या मोदी सरकाने निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्याला उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा दिला जाईल असे आश्वासन दिले होते. त्याची पुर्तता सरकारने केली नाही. त्यामुळे आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

४) **महागाईवर नियंत्रण :-** सध्या महागाई वाढत चालली आहे. त्यामुळे शेती अधिक अवघड होत चालली आहे. यासाठी सर्व प्रथम शासनाने महागाईवर नियंत्रण प्रस्थपीत करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन कमी आहे. अल्प उत्पादनात शेतकरी आपल्या गरजा पूर्ण करून शकत नाही. घेतलेले कर्ज परत करू शकत नाही. याचे मुख्य कारण वाढती महागाई आहे. महागाईवर नियंत्रण प्रस्थापीत केल्यास आत्महत्या कमी होवू शकतात.

५) **शेतीची मशागत :-** शेतीची मशागत करण्यासाठी शेतकऱ्याला जास्त खर्च येतो. यासाठी शासनाने महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना या आधारे शेतीची मशागत केल्यास शेतकऱ्याचा खर्च कमी होवू शकतो. शेतकऱ्याला आधार मिळू शकतो.शासनाने शेतीचा काही खर्च दिल्यास शेतकऱ्याला मदत होऊ शकतो. शेतकरी समाज व्यवस्थेमध्ये टिकून राहु शकतो . या पध्दतीची मदत शेतकऱ्याला देणे गरजेचे आहे.

६) **सिंचनात वाढ :-** राज्यात व विदर्भात बागायती शेतीचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पादन घटत चालले आहे. यामध्ये वाढ करायची असल तर सिंचनात वाढ करणे गरजेचे आहे. सिंचनात वाढ करण्यासाठी पाण्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. सिंचनाच्या पध्दती बदलने गरजेचे आहे. सिंचनाचे साधने बदलणे गरजेचे आहे. त्याच त्याच पध्दतीने सिंचन केल्यामुळे पाणी जास्त लागते. उत्पादन वाढत नाहीत. [illegible] नवीन सिंचन पध्दती उदा. स्प्रिंकलर , ठिंबक इ.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar,Dist.Buldana
330



Scanned by TapScanner

७) **नियमित वीज पूरवठा :-** शेतकऱ्याला नियमीत मोफत वीज पुरवठा देणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पादन वाढते. सिंचनासाठी विज आवश्यक असते.शासनाने शेतकऱ्याला वीज पुरवठा योग्य वेळी केल्यास आत्महत्या कमी होवू शकतात. त्याच बरोबर शासनाने शेतकऱ्यांना मोफत वीज देणे गरजेचे आहे. कारण शेकऱ्याला सर्व ठिकाणी खर्च करणे शक्य होत नाही. शेकऱ्याला गरज असते. तेंव्हा वीज उपलब्ध करून दिल्यास आत्महत्या कमी होऊ शकतात.

८) **प्रक्रिया उद्योग निर्मिती:-** शेतकऱ्याच्या मालावर प्रक्रिया उद्योग भांडवलदाराचे आहेत. हे प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांनी चालविल्यास त्याला रोजगार मिळू शकतो. त्याच्या उत्पादनाला योग्य भाव मिळू शकतो. त्याच्या भांडवलात वाढ होवू शकते. या पध्दतीचे प्रक्रिया उद्योग स्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांना आनुदान देणे गरजेचे आहे. या उद्योगाला शासनाने भांडवल उपलब्ध करून दिल्यास आत्महत्या कमी होऊ शकतात.

९) **शेतीपुरक व्यवसायाला अनुदान :-** शेतीला पुरक असलेले जोड व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्याला अनुदान मिळणे गरजेचे आहे. यासाठी त्याला सवलत देणे गरजेचे आहे. या योजना कोणत्या आहेत. याची माहिती शेतकऱ्याला कृषी विभागाने देणे गरजेचे आहे. असे केल्यास विदर्भातील शेतकऱ्याच्या आत्महत्या कमी होवू शकतात.

१०) **पिक विमा योजना :-** शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने सर्व पिकांना पीक विमा योजना लागु करावी. हा विमाशासनाने भरावा.आपत्तीच्या प्रसंगी शासनाने विमा कंपन्यानी मदत दयावी. शासनाने दुष्काळ जाहिर केल्यास शेतकऱ्याला त्याचे नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे. शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनाच्या पन्नास टक्के रक्कम तरी मिळणे गरजेचे आहे. असे केल्यास आत्महत्या कमी होऊ शकतात

**संदर्भसूची**

१) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था -प्रा. डॉ. करणसिंग राजपुत , साईनाथ प्रकाशन , नागपूर . २०१६
२) भारतातील आधुनिक वित्तीय व्यवस्थापन -प्रा. मुलाणी एम. यु. , सक्सेस प्रकाशन, पुणे. २०१८
३) भारतातील सामाजिक समस्या - रा. ज. लोटे, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर. २०१६
४) भारतातील सामाजिक समस्या - डॉ. प्रदिप आगलावे, साईनाथ प्रकाशन , नागपूर २०१८
५) दै.सकाळ मधील लेख.

Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330
Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned by TapScanner